महाराष्ट्र शासन

# सहायक आयुक्त, समाज कल्याण, कोल्हापूर

डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन विचारेमाळ कोल्हापूर

कोल्हापूर ०२३१-२६५१३१८ E-mail :- acswokolhapur@gmail.com

जा.क्र.सआसकको/भाराशि/महाडीबीटी/व्याव.शिष्यवृत्ती/२०२६-२७/2580 दि.०७/०७/२०२६

प्रति,

अधिष्ठाता/संचालक/प्राचार्य/रजिस्टार,
कनिष्ठ/वरिष्ठ/व्यावसायिक/बिगर व्यावसायिक/वैद्यकिय/तंत्र महाविद्यालय (सर्व),
कोल्हापूर जिल्हा.

विषयः- व्यावसायिक अभ्यासक्रम (वैद्यकीय/इंजिनिअरिंग) प्रवेशासाठी प्रयत्न करणाऱ्या विद्यार्थ्यांनी पर्यायी प्रवेश घेतलेल्या सर्वसाधारण बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या (BA/BSc/Diploma इ.) शिष्यवृत्ती अर्जाबाबत..

संदर्भ: - मा.आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य,पुणे यांचे पत्र क्र.२३४६, दि.३०/०६/२०२६.

उपरोक्त विषयान्वये आपणास सूचित करण्यात येते की, संदर्भिय पत्रान्वये दरवर्षी इ. १२ वी उत्तीर्ण झाल्यानंतर अनेक विद्यार्थी वैद्यकीय (Medical-MBBS/BAMS इ.) किंवा अभियांत्रिकी (Engineering) अशा व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या केंद्रीय प्रवेश प्रक्रियेत (NEET/CET/CAP-Round) सहभागी होतात. या प्रवेश प्रक्रियेदरम्यान स्पर्धा किंवा कमी गुणांमुळे अपेक्षित प्रवेश न मिळाल्यास, अनेक विद्यार्थी केंद्रीय प्रवेश प्रक्रियेचा निकाल लागेपर्यंत अथवा प्रवेश प्रक्रियेचे सर्व राऊंड पुर्ण होईपर्यंत तात्पुरत्या स्वरुपात बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेतात. काही विद्यार्थी तर संपूर्ण एक वर्षाकरिता गॅप घेऊन हा कालावधी शैक्षणिक दृष्ट्या वाया जाऊ नये म्हणून देखील तात्पुरत्या स्वरूपात बीए (BA), बीएससी (BSc), बीकॉम (BCom) व इतर तत्सम समकक्ष बिगर-व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेत असल्याचे निदर्शनास आले आहे.

त्याचप्रमाणे इ. १० वी उत्तीर्ण झालेले अनेक विद्यार्थी अभियांत्रिकी पदविका (उदा. पॉलीटेकनिक) या अभ्यासक्रमास प्रवेश घेऊ इच्छितात मात्र सदर प्रवेश प्रक्रियेत गुणवत्ते नुसार प्रवेश न मिळाल्यास या गॅप वर्षाकरिता इ.११ वी मध्ये प्रवेश घेतात किंवा १२ वी नंतर पुढील वर्षाच्या सामाईक प्रवेश प्रक्रियेद्वारे पॉलीटेकनिक अथवा तत्सम अभ्यासक्रमास प्रवेश घेतात.

या अनुषंगाने असे निदर्शनास येत आहे की, उपरोक्त नमूद दोन्ही परिस्थितीत सदर विद्यार्थी तात्पुरत्या घेतलेल्या इ.११ वी किंवा **सर्वसाधारण बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी महाडीबीटी** (MahaDBT) **पोर्टलवर** शिष्यवृत्ती/फ्रीशिप चा अर्ज भरतात आणि **शिष्यवृत्तीचा लाभ त्या शैक्षणिक वर्षाकरीता मंजूर होतो**. परंतु, काही कालावधीनंतर किंवा पुढील वर्षी जेव्हा या विद्यार्थ्यांची निवड पॉलीटेकनिक, वैद्यकीय किंवा अभियांत्रिकी सारख्या उच्च व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी होते, तेव्हा **महाडीबीटी पोर्टलवरील तांत्रिक तरतुदीनुसार व संबंधित शासन निर्णयातील विहित केलेल्या निकषांनुसार एखाद्या अभ्यासक्रमास प्रवेश घेऊन त्याकरिताच्या शिष्यवृत्तीचा लाभ घेऊन सदर अभ्यासक्रम अर्धवट सोडून कोणत्याही अभ्यासक्रमास नव्याने प्रवेश घेतला तरी देखील अशा विद्यार्थ्यांचा नव्याने घेतलेल्या अभ्यासक्रमाकरिता शिष्यवृत्तीचा अर्ज अपात्र होऊन त्यास त्यावर्षाकरिता कोणत्याही प्रकारच्या शिष्यवृत्तीचा लाभ घेता येत नाही.**



Seen for n/a.
(1) Hon. Secretary UG PG Admission Cell
(2) student Notice Board
(3) website for public Infn.
(4)
8.7.26

Yashwant Ayurvedic College, P. G. T. & R. C. Kodoli
Inward No. 553 ATTESTED 8/7/2026
File No. .......... File Name ..........
Letter given to section/staff
Principal
Yashwant Ayurvedic College, P.G.T.&R.C.
Kodoli, Tal. Panhala, Dist. Kolhapur
Page 58
Scanned with OKEN Scanner

तथापि, अशा प्रकरणाबाबत शासन व आयुक्तालय स्तरावर वारंवार विद्यार्थी व त्यांच्या पालकांकडून तक्रारी प्राप्त होत आहेत. यामध्ये विद्यार्थ्यांचे शैक्षणिक व आर्थिक नुकसान रोखण्याकरिता, क्षेत्रीय कार्यालयामार्फत आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व महाविद्यालयांना खालीलप्रमाणे सूचना तात्काळ निर्गमित करणेबाबत सुचित केले आहे.

१) **विद्यार्थ्यांचे समुपदेशनः-** महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्या अशा विद्यार्थ्यांचे प्रवेशाच्या वेळीच समुपदेशन करण्यात यावे, जेणेकरून ते अनवधानाने 'गॅप' वर्षांमधील प्रवेशित सर्वसाधारण बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमा करिता शिष्यवृत्ती अर्ज करणार नाहीत.

२) **व्यापक प्रसिद्धीः-** याबाबत विद्यार्थ्यांसाठीचा 'माहिती पत्रक व जाहीर आवाहन' महाविद्यालयाच्या **मुख्य सूचना फलकावर, डिजिटल ग्रुप्सवर आणि शिष्यवृत्ती विभागाबाहेर ठळकपणे प्रसिद्ध करावा.**

३) **प्रवेश अर्ज पडताळणीः-** विद्यार्थ्यांनी जर काही कालावधीनंतर त्याच शैक्षणिक वर्षात किंवा पुढील वर्षी व्यावसायिक अभ्यासक्रमाला जाण्याचा मानस व्यक्त केला असेल, तर त्यांना चालू वर्षांमधील प्रवेशित सर्वसाधारण **बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमाकरिता शिष्यवृत्तीचा पर्याय** न **अवलंबण्याचे** मार्गदर्शन **महाविद्यालयाच्या शिष्यवृत्ती विभाग व समान संधी केंद्रामार्फत देण्यात यावे.** मात्र अशा स्थितीत विद्यार्थ्याने सदर अभ्यासक्रमाकरिता विहीत केलेले शैक्षणिक शुल्क भरणे क्रमप्राप्त राहतील. याबाबतच्या **स्पष्ट लेखी सूचना महाविद्यालयाने त्यांच्या महाविद्यालयात प्रवेश घेऊ इच्छित असलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश घेतेवेळी देण्यात याव्यात.**

४) उपरोक्त नमूद परिस्थतीमध्ये असे निदर्शनास आले आहे की, विशेषतः तात्पुरत्या स्वरुपात बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमाकरिता प्रवेश घेऊन शिष्यवृत्ती प्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांकडून चलनाद्वारे अदा करण्यात आलेल्या शिष्यवृत्तीची रक्कम शासनस्तरावर भरणेस्तव सूचित करण्यात येत आहे. तथापि, सदर **शिष्यवृत्तीची रक्कम ही डीबीटी तत्वावर राज्यशासन तसेच केंद्रशासन स्तरावरुन थेट विद्यार्थ्यांच्या खात्यामध्ये जमा होत असल्याने अशी डीबीटी तत्वावर अदा झालेली रक्कम शासनास चलनाद्वारे परत करावयाचे कोणतेही वित्तीय नियम प्रचलित नाहीत.**

तरी उपरोक्त नमूद पार्श्वभुमी लक्षात घेता आपल्या महाविद्यालयातील प्रवेशित पात्र विद्यार्थ्यांचे भविष्यात शिष्यवृत्ती / फ्रीशिप अभावी व्यावसायिक शिक्षणाचे नुकसान होणार नाही याची गांभीर्याने नोंद घेऊन, सदर सूचनांची काटेकोर अंमलबजावणी करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

(सचिन साळे)
**सहायक आयुक्त,**
**समाज कल्याण, कोल्हापूर**

**प्रत माहितीस्तव सविनय सादर**

१. मा.सहआयुक्त (शिक्षण), समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,पुणे.
२. मा.प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण, पुणे विभाग पुणे.



Scanned with OKEN Scanner

महाराष्ट्र शासन

समाज कल्याण आयुक्तालय, ३ चर्च पथ, महाराष्ट्र राज्य, पुणे-१
दूरध्वनी क्र.२०-२६१२७५६९ ईमेल - escholcommunication@gmail.com

जा.क्र.सकआ/शिक्षण/भासशि/डीबीटी-पत्रव्यवहार/का-४क/२६-२७/२३४६ दि. ३०/०६/२०२६

प्रति,

सर्व, प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग.

सर्व, सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण.

**विषय: व्यावसायिक अभ्यासक्रम (वैद्यकीय/इंजिनिअरिंग) प्रवेशासाठी प्रयत्न करणाऱ्या विद्यार्थ्यांनी पर्यायी प्रवेश घेतलेल्या सर्वसाधारण बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या (BA/BSc/Diploma इ.) शिष्यवृत्ती अर्जाबाबत**

उपरोक्त विषयान्वये आपणास सूचित करण्यात येते की, दरवर्षी इ. १२ वी उत्तीर्ण झाल्यानंतर अनेक विद्यार्थी वैद्यकीय (Medical - MBBS/BAMS इ.) किंवा अभियांत्रिकी (Engineering) अशा व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या केंद्रीय प्रवेश प्रक्रियेत (NEET/CET/CAP-Round) सहभागी होतात. या प्रवेश प्रक्रियेदरम्यान स्पर्धा किंवा कमी गुणांमुळे अपेक्षित प्रवेश न मिळाल्यास, अनेक विद्यार्थी केंद्रीय प्रवेश प्रक्रियेचा निकाल लागेपर्यंत अथवा प्रवेश प्रक्रियेचे सर्व राऊंड पुर्ण होईपर्यंत तात्पुरत्या स्वरुपात बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेतात. काही विद्यार्थी तर संपूर्ण एक वर्षाकरिता गॅप घेऊन हा कालावधी शैक्षणिक दृष्टया वाया जाऊ नये म्हणून देखील तात्पुरत्या स्वरूपात बीए (BA), बीएससी (BSc), बीकॉम (BCom) व इतर तत्सम समकक्ष बिगर-व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेत असल्याचे निदर्शनास आले आहे.

त्याचप्रमाणे इ. १० वी उत्तीर्ण झालेले अनेक विद्यार्थी अभियांत्रिकी पदविका (उदा. पॉलीटेकनिक) या अभ्यासक्रमास प्रवेश घेऊ इच्छितात मात्र सदर प्रवेश प्रक्रियेत गुणवत्ते नुसार प्रवेश न मिळाल्यास या 'गॅप वर्षाकरिता इ.११ वी मध्ये प्रवेश घेतात किंवा १२ वी नंतर पुढील वर्षाच्या सामाईक प्रवेश प्रक्रियेद्वारे पॉलीटेकनिक अथवा तत्सम अभ्यासक्रमास प्रवेश घेतात.

या अनुषंगाने असे निदर्शनास येत आहे की, उपरोक्त नमूद दोन्ही परिस्थितीत सदर विद्यार्थी तात्पुरत्या घेतलेल्या इ.११ वी किंवा सर्वसाधारण बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी महाडीबीटी (MahaDBT) पोर्टलवर शिष्यवृत्ती/फ्रीशिप चा अर्ज भरतात आणि शिष्यवृत्तीचा लाभ त्या शैक्षणिक वर्षाकरीता मंजूर होतो. परंतु, काही कालावधीनंतर किंवा पुढील वर्षी जेव्हा या विद्यार्थ्यांची निवड पॉलीटेकनिक, वैद्यकीय किंवा अभियांत्रिकी सारख्या उच्च व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी होते, तेव्हा महाडीबीटी पोर्टलवरील तांत्रिक तरतुदीनुसार व संबंधित शासन निर्णयातील विहित केलेल्या निकषांनुसार एखाद्या अभ्यासक्रमास प्रवेश घेऊन त्याकरिताच्या शिष्यवृत्तीचा लाभ घेऊन सदर अभ्यासक्रम अर्धवट सोडून कोणत्याही अभ्यासक्रमास नव्याने प्रवेश घेतला तरी देखील अशा

Scan & Fwd to Concerned Authority & NB Students [illegible] 08-07-26



Scanned with OKEN Scanner

विद्यार्थ्यांचा नव्याने घेतलेल्या अभ्यासक्रमाकरिता शिष्यवृत्तीचा अर्ज अपात्र होऊन त्यास त्यावर्षाकरिता कोणत्याही प्रकारच्या शिष्यवृत्तीचा लाभ घेता येत नाही.

तथापि, अशा प्रकरणाबाबत शासन व आयुक्तालय स्तरावर वारंवार विद्यार्थी व त्यांच्या पालकांकडून तक्रारी प्राप्त होत आहेत. यामध्ये विद्यार्थ्यांचे शैक्षणिक व आर्थिक नुकसान रोखण्याकरिता, क्षेत्रीय कार्यालयामार्फत आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व महाविद्यालयांना खालीलप्रमाणे सूचना तात्काळ निर्गमित कराव्यात.

१. **विद्यार्थ्यांचे समुपदेशन:** महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्या अशा विद्यार्थ्यांचे प्रवेशाच्या वेळीच समुपदेशन करण्यात यावे, जेणेकरून ते अनवधानाने 'गॅप' वर्षामधील प्रवेशित सर्वसाधारण बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमा करिता शिष्यवृत्ती अर्ज करणार नाहीत.

२. **व्यापक प्रसिद्धी:** याबाबत विद्यार्थ्यांसाठीचा 'माहिती पत्रक व जाहीर आवाहन' महाविद्यालयाच्या मुख्य सूचना फलकावर, डिजिटल ग्रुप्सवर आणि शिष्यवृत्ती विभागाबाहेर ठळकपणे प्रसिद्ध करावा.

३. **प्रवेश अर्ज पडताळणी:** विद्यार्थ्यांनी जर काही कालावधीनंतर त्याच शैक्षणिक वर्षात किंवा पुढील वर्षी व्यावसायिक अभ्यासक्रमाला जाण्याचा मानस व्यक्त केला असेल, तर त्यांना चालू वर्षामधील प्रवेशित सर्वसाधारण बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमा करिता शिष्यवृत्तीचा पर्याय न अवलंबण्याचे मार्गदर्शन महाविद्यालयाच्या शिष्यवृत्ती विभागातर्फे देण्यात यावे. मात्र अशा स्थितीत विद्यार्थ्याने सदर अभ्यासक्रमाकरिता विहीत केलेले शैक्षणिक शुल्क भरणे क्रमप्राप्त राहतील. याबाबतच्या स्पष्ट लेखी सूचना महाविद्यालयाने त्यांच्या महाविद्यालयात प्रवेश घेऊ इच्छित असलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश घेतेवेळी देण्यात याव्यात.

४. उपरोक्त नमूद परिस्थतीमध्ये असे निदर्शनास आले आहे की, विद्यार्थी, पालक अथवा महाविद्यालयांना सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालयांकडून देखील योग्य ते मार्गदर्शन प्राप्त होत नाही. विशेषत: तात्पुरत्या स्वरुपात बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमाकरिता प्रवेश घेऊन शिष्यवृत्ती प्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांकडून चलनाद्वारे अदा करण्यात आलेल्या शिष्यवृत्तीची रक्कम शासनस्तरावर भरणेस्तव महाविद्यालय व सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालयांकडून सूचित करण्यात येत आहे.

तथापि, याबाबत आपणास कळविण्यात येत आहे की, सदर शिष्यवृत्तीची रक्कम ही डीबीटी तत्वावर राज्यशासन तसेच केंद्रशासन स्तरावरुन थेट विद्यार्थ्यांच्या खात्यामध्ये जमा होत असल्याने अशी डीबीटी तत्वावर अदा झालेली रक्कम शासनास चलनाद्वारे परत करावयाचे कोणतेही वित्तीय नियम प्रचलित नाहीत. त्यामुळे सदर अदा झालेली रक्कम शासनास परत करावयाचे मार्गदर्शन आपल्या स्तरावरुन विद्यार्थ्यांना व संबंधित महाविद्यालयांना शासन परवानगी घेतल्याशिवाय करु नये.

Scanned with OKEN Scanner

तरी उपरोक्त नमूद पार्श्वभुमी लक्षात घेता आपल्या अधिनस्त असलेल्या महाविद्यालयातील प्रवेशित पात्र विद्यार्थ्यांचे भविष्यात शिष्यवृत्ती /फ्रीशिप अभावी व्यावसायिक शिक्षणाचे नुकसान होणार नाही याची गांभीर्याने नोंद घेऊन, सदर सूचनांची काटेकोर अंमलबजावणी करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

30/6/26

(दिपा मुधोळ-मुंडे)

आयुक्त,

समाज कल्याण,

महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रत माहितीस्तव:

१. संचालक, उच्च माध्यमिक शिक्षन विभाग, महाराष्ट्र राज्य पुणे

२. संचालक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई

३. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई

४. कक्ष अधिकारी, शिक्षण-१, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग मंत्रालय मुंबई.

Scanned with OKEN Scanner